**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१.**
**संकेतस्थळ :- https://scea.maharashtra.gov.in/**
फोन :- (०२०) २६०५०६४१          ई-मेल :- scea-pune@gov.in, sceapune@gmail.com

२८३

**क्र. रासनिप्रा / कक्ष- १७ / डिजिटल व्होटर्स लिस्ट / टेंडर / २०२३          दि. ०९ / ०१ / २०२४**

सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१ हे त्यांचे अखत्यारीमध्ये येत असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या संबंधाने आवश्यक असलेल्या प्रारूप मतदार याद्या आणि अंतिम मतदार याद्या वेळोवेळी तयार करणे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर सदर याद्या प्रसिद्ध करणे या कामासाठी इच्छुक सेवापुरवठादारांकडून देकार आणि दरपत्रके मागवीत आहेत. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या कामकाजाबाबत संकेतस्थळ www.scea.maharashtra.gov.in येथे सर्व तपशील व अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या शिवाय इच्छुक अर्जदारांना अधिक माहिती आवश्यक असल्यास त्यांनी या कार्यालयाकडे कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये संपर्क साधावा.

अर्ज सादर करण्याची मुदत दि. १०-०१-२०२४ ते दि. ३१-०१-२०२४ सायं. ०५.०० वा. पर्यंत या कालावधीत कार्यालयीन वेळेत राहील. कोणत्याही कारणाने उशीरा प्राप्त होणारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने,

**सचिव**

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१**

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१.**
**संकेतस्थळ :- https://scea.maharashtra.gov.in/**
फोन :- (०२०) २६०५०६४१ ई-मेल :- scea-pune@gov.in, sceapune@gmail.com

**क्र. रासनिप्रा / कक्ष- १७ / डिजिटल व्होटर्स लिस्ट / टेंडर / २०२३ दि. ०९ / ०१ / २०२४**

सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे ४११००१ हे त्यांचे अखत्यारीमध्ये येत असलेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांच्या संबंधाने आवश्यक असलेल्या प्रारूप मतदार याद्या आणि अंतिम मतदार याद्या वेळोवेळी तयार करणे आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर सदर याद्या प्रसिद्ध करणे या कामासाठी इच्छुक सेवापुरवठादारांकडून देकार आणि दरपत्रके मागवीत आहेत.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या कामकाजाबाबत संकेतस्थळ www.scea.maharashtra.gov.in येथे सर्व तपशील व अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या शिवाय इच्छुक अर्जदारांना अधिक माहिती आवश्यक असल्यास त्यांनी या कार्यालयाकडे कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये संपर्क साधावा.

अर्ज सादर करण्याची मुदत दि. १०-०१-२०२४ ते दि. ३१-०१-२०२४ सायं. ०५.०० वा. पर्यंत या कालावधीत कार्यालयीन वेळेत राहील. कोणत्याही कारणाने उशीरा प्राप्त होणारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**प्रास्ताविक –**

महाराष्ट्र राज्यात दि. ३१-०३-२०२२ रोजी एकूण सहकारी संस्थांची संख्या २,१७,४१० (अस्थायी), तसेच, कृषि उत्पन्न बाजार समित्यांची संख्या ३०६ आहे. एकूण सहकारी संस्थांची संख्या २,१७,४१० (अस्थायी) पैकी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या अखत्यारीमध्ये "२५० अथवा त्यापेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्था" येत नाहीत. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या अखत्यारीमध्ये विविध प्रकारच्या ०.९८ लाख संस्था येतात. या मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरीसहकारी बँका, नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, विविध कार्यकारी सहकारी संस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी दूध उत्पादक संस्था आणि इतर प. दु. म. संस्था, सहकारी औद्योगिक वसाहती, औद्योगिक सहकारी संस्था, सहकारी संघीय संस्था, २५१ अथवा त्यापेक्षा जास्त सभासद संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्था, इत्यादि वर्गीकरणातील संस्थांचा समावेश आहे.